# वाचलेच पाहिजे असे काही - भाग १

## (चरित्र-आत्मचरित्र)



संपादन

जयश्री काटीकर

एकदा लहानपणी
पुस्तकांशी मैत्री झाली की,
ती संगत कधीही सुटत नाही.
जीवनातले अनुभव
अधिक डोळसपणे घेण्याची शक्ती
पुस्तकं आपल्याला देतात;
आपलं व्यक्तिमत्त्व अधिक सुजाण,
संपन्न करतात.
परंतु नेमकं काय वाचावं
हे आपल्याला समजत नसतं.
या पुस्तकात मराठी साहित्यातील
पंचवीस प्रेरक चरित्र-आत्मचरित्र
यांचा परिचय करून दिला आहे.
सोबत वाचनीय अशा
पन्नास पुस्तकांची यादीही आहे.
एखाद्या पुस्तकातील
सौंदर्याचा आस्वाद कसा घेता येतो;
ही दृष्टी कुमारवयातील वाचकांना मिळावी
हा या पुस्तकाचा हेतू !

छात्र प्रबोधन प्रकाशन, पुणे
किंमत ₹ ४०/-

# वाचलेच पाहिजे असे काही

## भाग - १

(निवडक चरित्र - आत्मचरित्र यांचा परिचय)

संपादन

जयश्री काटीकर

छात्र प्रबोधन

ज्ञान प्रबोधिनी

५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411 030

www.chhatraprabodhan.org

**‘वाचलेच पाहिजे असे काही’ भाग – १**

(‘वाचलेच पाहिजे असे काही’ या ‘छात्र प्रबोधन’मधील सदरात प्रकाशित झालेल्या निवडक चरित्र–आत्मचरित्रपर पुस्तक–परिचयांचा संग्रह)

❖ **छात्र प्रबोधन रौप्य महोत्सवी अक्षरभेट**


❖ **प्रकाशक व मुद्रक**

प्रा. महेन्द्र सेठिया

संपादक, ‘छात्र प्रबोधन’,

ज्ञान प्रबोधिनी, पुणे 411030 ☎ (020) 24207 174/175

email - chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

❖ **अक्षरजुळणी**

छात्र प्रबोधन

ज्ञान प्रबोधिनी, पुणे

❖ **मुखपृष्ठ**

दीपाली पाटवदकर

❖ **प्रथम आवृत्ती :** राष्ट्रीय सौर पौष, शके १९३८, जानेवारी २०१७



© स्वामित्व प्रकाशकाच्या स्वाधीन



❖ **किंमत**

₹ ४०/-


***'Vachlech Pahije Ase Kahi'***

***(Reviews of some selected books in Marathi Literature)***

(छात्र प्रबोधन मासिकात १९९१ ते २०१० या कालावधीत प्रसिद्ध झालेले पुस्तक–परिचय या पुस्तकात पुनर्मुद्रित केले आहेत.)

# प्रस्तावना

अनुभवसंपन्न, ज्ञानसंपन्न होण्यासाठी माणसानं सतत 'वाचतं' राहिलं पाहिजे. आता पूर्वीची परिस्थिती बदलली. पुस्तकं online सुद्धा उपलब्ध होऊ लागली. टीव्ही, मोबाईल, सोशल साईटस् यांच्या गदारोळातही वाचनाचे स्रोत भरपूर प्रमाणात आज उपलब्ध आहेत. त्याचाही फायदा आपण करून घ्यायला हवा. वाचनाला पर्याय नाही, हे खरेच ! पण आताच्या माहिती तंत्रज्ञानाच्या आणि विशेषत: माहितीच्या विस्फोटाच्या परिस्थितीत नेमकं काय वाचावं, सकस-अभिरुचीपूर्ण पुस्तकांची निवड कशी करावी हे कळत नाही. त्यासाठीच 'वाचलेच पाहिजे असे काही' या पुस्तकांची रचना करण्यात आली.

'छात्र प्रबोधन'च्या २५ वर्षांच्या वाटचालीत थोडी-थोडकी नाही तर जवळजवळ १००-१२५ पुस्तकांचा परिचय आपण मुलांना करून दिला, ही अर्थातच अभिमानास्पद गोष्ट ! या पुस्तकपरिचयांमध्येच काही नवीन पुस्तकपरिचयांची भर घालून कुमारांसाठी प्रातिनिधिक ठरतील असे 'वाचलेच पाहिजे' या पुस्तकाचे तीन भाग करण्याचा मानस आहे. पहिल्या भागात प्रेरक अशा २५ चरित्र-आत्मचरित्रांचा समावेश आहे. दुसऱ्या भागात अनुभवविश्व समृद्ध करणाऱ्या अशा २५ कथा-कादंबऱ्यांचा परिचय असेल तर तिसरा भाग हा संकीर्ण स्वरूपाचा (ललित, प्रवासवर्णन, काव्यसंग्रह, वैचारिक इ. अनेक साहित्य प्रकारांचा) असेल.

'वाचलेच पाहिजे...' च्या या पहिल्या भागात तुम्हाला काही चरित्र-आत्मचरित्रांचा परिचय करून दिला आहे. मराठी साहित्यातल्या शेकडो चरित्र-आत्मचरित्रात्मक पुस्तकांतून २५ पुस्तकांची निवड करणं ही खरंच तारेवरची कसरत होती. समाजसुधारक, कलावंत, शास्त्रज्ञ, समाजातील वंचित घटक, खेळाडू असे वेगवेगळे निकष नक्की करून ही पुस्तकांची निवड केली आहे. मराठी साहित्याची ऐतिहासिक वाटचाल, पुस्तकांची शैली इ. मुद्द्यांचा विचारही या निवडीमागे होताच. पण तरीही ही निवड परिपूर्ण नाही याचीही जाणीव मनात आहेच. त्यामुळेच कुमारांनी जरूर वाचावीत अशा पन्नास पुस्तकांची यादीही यासोबत देत आहोत. त्यात अजूनही सतत भर पडत राहणारच, यात शंका नाही.

हे पुस्तकपरिचय वाचताना 'मोठी माणसं' मोठ्ठी कशी होत गेली, लहान असताना-शाळेत असताना ती कशी होती, त्यांनी घेतलेले अपार कष्ट, त्या-त्या वेळची सामाजिक परिस्थिती, त्या त्या व्यक्तींचं कार्य याची तोंडओळख तुम्हाला होईल आणि ही पुस्तकं मुळातून वाचायला तुम्ही उद्युक्त व्हाल असा विश्वास वाटतो.

**- जयश्री काटीकर**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. माझी जन्मठेप | वि. दा. सावरकर | ५ |
| २. राजा शिवछत्रपती | बाबासाहेब पुरंदरे | ७ |
| ३. एक होता कार्व्हर | वीणा गवाणकर | ९ |
| ४. संपूर्ण स्मृतिचित्रें | लक्ष्मीबाई टिळक | ११ |
| ५. राष्ट्रद्रष्टे विवेकानंद | वि. वि. पेंडसे | १३ |
| ६. गाडगे महाराज | गो. नी. दांडेकर | १५ |
| ७. युद्धनेतृत्व | दि. वि. गोखले | १७ |
| ८. इंदिरा गांधी | अनु. अशोक जैन | १९ |
| ९. ऋतुशैशव | अनु. उल्का राऊत | २१ |
| १०. आठवणींचे पक्षी | प्र. ई. सोनकांबळे | २३ |
| ११. शिखरावरून | अनु. श्रीकांत लागू | २५ |
| १२. खरे मास्तर | विभावरी शिरुरकर | २७ |
| १३. डॉ. आयडा स्कडर | वीणा गवाणकर | २९ |
| १४. आमचा बाप अन् आम्ही | नरेन्द्र जाधव | ३१ |
| १५. आय डेअर | अनु. आशा कर्दळे | ३३ |
| १६. आम्ही असे घडलो | संपा. नीलिमा करमरकर | ३५ |
| १७. वाट तुडवताना | उत्तम कांबळे | ३७ |
| १८. फील्ड मार्शल–सॅम माणेकशा | अनु. भगवान दातार | ३९ |
| १९. आम्ही शास्त्रज्ञ असे झालो | अनु. पंडित विद्यासागर | ४१ |
| २०. प्रकाशवाटा | डॉ. प्रकाश आमटे | ४३ |
| २१. झोंबी | आनंद यादव | ४५ |
| २२. नापास मुलांची गोष्ट | संपा. अरुण शेवते | ४७ |
| २३. इडली ऑर्किड आणि मी | विठ्ठल कामत | ४९ |
| २४. खरेखुरे आयडॉल्स | संपा. सुहास कुलकर्णी | ५१ |
| २५. जल आक्रमिले | सुमेध वडावाला | ५३ |
| रसास्वाद कसा घ्यावा... | शैलजा देशमुख | ५५ |